संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ८८३/२०१४

महाराष्ट्र सरकार –वि– सुभाष

निशाणी क्र. १५

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०१

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नावः ज्ञानेश्वर

वडीलांचे नावः रंगनाथ

आडनावः वाघमारे

माझे वयः ४५ वर्ष, व्यवसायः मजुरी,

राहणारः देऊळगांव ताड, ता. भोकरदन, जि. जालना.

**सरतपासणी सरकारी वकिल श्री. ए. एन. गवळी यांच्याद्वारे**

०१. मला दि. ०४/०८/२०१४ रोजी माझे गांव केदारखेडा येथे जायचे होते. म्हणुन मी सकाळी ०८.०० ते ०९.०० वाजण्याच्या सुमारास बाणेगांव फाटा येथे गेलो. त्यावेळी माझेसोबत मधुकर वाघमारे, फारुख शेख व दौलतराव वाघमारे उपस्थित होते. त्यावेळी एक भरधाव वेगात दुधाची गाडी जालना ते भोकरदन अशी आली. सदर गाडीने मला धडक दिली. त्यानंतर तो गाडीवाला सरळ पुढे निघून गेला. मला त्यावेळी गाडीचा क्रमांक पाहता आला नाही.

०२. सदर अपघातामध्ये मला छातीवर, डोक्यावर व पायावर मार लागला. तसेच माझ्या बरगडया मोडल्या होत्या. त्यानंतर मला मधुकर वाघमारे, फारुक शेख व दौलतराव वाघमारे यांनी दिपक हॉस्पीटल, जालना येथे नेले. मला डॉक्टरांनी दहा ते बारा दिवसांनी उपचारानंतर सोडले होते. त्यानंतर मला समजले की, आरोपी हा मला धडक देणारा टेम्पो चालवत होता. मला धडक दिल्यानंतर टेम्पो जागेवर न थांबता निघून गेला होता. सदरचा टेम्पो हा भरधाव वेगात होता. ज्यावेळी मला धडक दिली त्यावेळी मी वर नमूद फाटयावर रस्त्याच्या बाजूला उभे होतो. मौजे राजूर येथे माझा जबाब घेतला होता.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. ठोंबरे यांच्याकडून**

०३. हे म्हणणे खरे आहे की, जालना ते भोकरदन हा महामार्ग असुन त्यावरुन अनेक दुधाच्या गाडया ये–जा करत असतात. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेवेळी जालना ते भोकरदन या रस्त्यावर बरेच खड्डे होते व संपूर्ण रस्ता खराब होता. हे म्हणणे खरे

आहे की, रस्त्याच्या बाजूला (पंखे) देखील खड्डे होते. मला आजरोजी हे सांगता येणार नाही की, मी पोलीसांना दौलतराव वाघमारे माझ्यासोबत होते ही बाब सांगितली अगर कसे? मी पोलीसांना जबाब देतांना तथाकथित घटनेवेळी मी रस्त्याच्या बाजुला उभा होतो ही बाब सांगितली होती. साक्षीदारास त्याचा जबाब वाचून दाखविला त्यामध्ये सदरची बाब नमूद नसल्याचे साक्षीदाराने सांगितले. सदरची बाब नमुद का नाही याचे कारण सांगता येणार नाही असे साक्षीदाराने सांगितले.

०४. मौजे राजूर व केदारखेडा येथे सरकारी दवाखाना आहे. मौजे राजूर हे तथाकथित घटनास्थळापासून पाच किलोमीटर व केदारखेडा हे दोन किलोमीटर असुन जालना हे तीस किलोमीटर आहे. मौजे राजूर येथे पोलीस ठाणे आहे. दौलतराव माझा सख्खा भाऊ आहे. मी दवाखान्यात असल्याने फिर्याद कोणी दिली हे मला सांगता येणार नाही. पोलीसांनी माझा जबाब अंदाजे २० ते २१ दिवसांनी नोंदविला होता. मी दवाखान्यातून सुटल्यानंतर माझ्या घरीच होतो. नुकसान भरपाई मिळण्यासाठी मी तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, केवळ तक्रार दाखल करायची म्हणुन मी आरोपीच्या गाडीच्या क्रमांक सांगितला होता. मी पोलीसांना आरोपीचे नाव कोणत्या नातेवाईकाकडून कळाले ही बाब सांगितली नव्हती.

०५. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये नमूद घटना खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दौलतरावसोबत मिळून मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांकः १८.०७.२०२५

(मयुरेश आर. काळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन